Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# एक नयनरम्य पर्यटन स्थळ सालबर्डी

डॉ. सौ. अरुणा प्र. पाटील,
भूगोल विभाग प्रमुख
प्रा.राजाभाऊ देशमुख महाविद्यालय, नांदगांव खंडे, जि.अमरावती

**प्रस्तावना–**

पर्यटन स्थळांच्या निर्मितीसाठी अनुकूल अशी नैसर्गिक व सांस्कृतिक परिस्थिती उपलब्ध असावी लागते. ज्या ठिकाणी अशी परिस्थिती उपलब्ध असते तेथेच पर्यटनस्थळांची निर्मिती होत असते. निसर्गत भुपृष्ठावर भुरूपात प्रचंड विविधता आढळते. उंच डोंगररांगा, पर्वत शिखरे, नद्याच्या खोल दज्या, पर्यटकांना आकर्षित करीत असतात. असेच एक आकर्षित करणारे नयनरम्य स्थळ म्हणजे सालबर्डी. सालबर्डी या ठिकाणी निसर्गाने सौंदर्याची मुक्तहस्ते उधळण केलेली आहे. निसर्गाचा आगळावेगळा चमत्कार या पाहावयास मिळतो. तो म्हणजे येथील गुहेत स्वयंभू लिंग आहे. या लिंगावार सतत पाण्याचा अभिकेष अखंडपणे सुरू असतो.


**स्थान व विस्तार –**

नैसर्गिक सौंदर्याने नटलेले प्राचीन काळापासून धार्मिक तिर्थक्षेत्र म्हणुन विख्यात असलेले सालबर्डी हे ठिकाण सातपुडा पर्वत रांगेत असून मध्यप्रदेश राज्यात बैतुल जिल्ह्यात मुलताई तालुक्यामध्ये आहे. सालबर्डी हे मोर्शी तालुक्याच्या ठिकाणापासून १२ कि.मी.अंतरावर तर अमरावती पासून उत्तरेकडे ७० कि.मी. अंतरावर आहे. सालबर्डीचा अक्षवृत्तीय विस्तार २१० २८′ उत्तर ते २१० २४′ उत्तर अक्षांश आणि रेखावृत्तीय विस्तार ७८०५′ पूर्व ते ७७० ५८′ पूर्व रेखांश इतका आहे.

**भुपृष्ठ रचना–**

सालबर्डी हे अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वत रांगेमध्ये समुद्र सपाटीपासून ४०० मीटर उंचीवर वसलेले आहे. हा प्रदेश पर्वतीय दज्याखोज्यांचा तीव्र उताराचा आहे. येथील स्तरीत खडक भुपृष्ठावर उघडे पडलेले दिसतात.



येथील खडकामध्ये वाळूधा खडकाचा प्रकार सर्वत्र पाहावयास मिळतो या ठिकाणी गुहा निर्माण झाली असून गुहा सुद्धा स्तरीत खडकात निर्माण झाली आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर विदारणाची क्रिया सुरू आहे. प्रामुख्याने यांत्रिक विदारणामुळे खडकाचे मोठमोठे खंड विलग झालेले दिसतात. माडू नदीच्या खनन कार्यामुळे रांजण खडगे मोठ्या प्रमाणात निर्माण झालेले आढळतात. तसेच माडू नदीच्या पात्रात एक मोठा डोह असून तो हत्तीडोह म्हणून ओळखला जातो.



**स्तरीत खडक**

**नदी प्रणाली–** माडू ही या प्रदेशातील प्रमुख नदी असून ती वर्धा नदीची उपनदी आहे. येथे गरम पाण्याचाझरा सुद्धा आढळतो. यावरून स्पष्ट होते की येथे केव्हा तरी ज्वालामुखीचा उद्रेक झाला असावा.

**वनस्पती –** हा प्रदेश पर्वतीय दज्या खोज्यांचा असल्यामुळे या प्रदेशात दाट जंगले निर्माण झालेली आहेत. या जंगलामध्ये विशेषत साग, शिस, बाभुळ, कडूनिंब, आंबा, सिताफळ इ. वृक्ष आढळतात. येथील मुख्य पिके म्हणजे संत्रा, गहु, मका, ज्वारी आणि कापूस ही आहेत.

**हत्ती डोह** **माडू नदी**

**हवामान –**

येथील हवामान उष्ण स्वरूपाचे असून एप्रिल व मे महिन्यात तापमान ४५० से. तर डिसेंबर महिन्यात तापमान ८० से. पर्यंत आढळते. येथील सरासरी पर्जन्य ६०० मि.मी. असनू तो जून ते सप्टेंबर या महिन्यात पडतो.

**अभ्यास स्थळाचे पर्यटन स्थळ म्हणून महत्त्व –**

फार पुर्वीपासून मानवाला पर्वतीय प्रदेशांचे आकर्षण आहे.पर्वतीय व टेकड्यांच्या भागात पर्यटकांची भ्रमंती सतत सुरू असते. नैसर्गिक सृष्टी सौंदर्य हा पर्यटनाचा आत्मा मानला जातो. त्यातुनच पर्यटकांना खरा आनंद मिळतो. घनदाट हिरवी जंगले त्यातील विविध आकारांची विविध प्रकारांची झाडे, वेली, जंगलाच्या आधाराने वावरणारी माकडे, पशुपक्षी या जंगल व्याप्त प्रदेशाचे नंदनवनात रूपांतर करतात.

जंगलाना पर्यावरण व पर्यटनाच्या दृष्टिने विशेष महत्त्व आहे. जंगला मुळेच सृष्टी सौदर्यं निर्माण होते. सालबर्डी येथे उंच पर्वतीय क्षेत्रात जंगलाचे प्रमाण अधिक आढळते व हेच उंच भाग पर्यटकांना आकर्षित करतात.

पर्वतीय प्रदेश ओबड धोबड भुपृष्ठरचना खोलदज्या, वेळीवाकडी वळणे घेऊन खळखळुन वाहणारी माडू नदी, खडकांचे प्रकार थंड पाण्याचे कुंड,दाट जंगले इत्यादी नैसर्गिक सौंदर्यामुळे सालबर्डी हा प्रदेश अमरावती जिल्ह्यातील लोकांसाठीच नव्हेतर महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यातील पर्यटकांसाठी महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. अनेक शाळा, महाविद्यालयाच्या सहली येथे येतात आणि भुरूपे बघून मंत्रमुग्ध होतात.

सालबर्डी हे हिंदु, जैन महानुभव पंथीय, आदिवासी व वन्यजमाती या सर्वाचे पवित्र तिर्थक्षेत्र आहे. महानुभवांचे तिर्थ स्थळ चक्रधर स्वामींच्या वास्तव्याने पुनीत झाले आहे. त्यामुळे हे स्थळ नावलौकिकास आले म्हणूनच सालबर्डी हे भौगोलिक पर्यटनाबरोबरच एक धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.

येथे महादेवाची अतिप्राचीन अशी नैसर्गिक गुहा आहे ही गुहा दुर्गम पर्वतावर आहे. या गुहेत स्वयंभू लिंग असून या लिंगावर सतत अखंडपणे पाण्याचा अभिकेष सुरू असतो. ही निसर्गाची किमया बघण्यासाठी दुर्गम भागात असूनही येथे पर्यटक पोहचतात व महादेवाच्या दर्शनाने आनंदित होतात. अशा प्रकारे सालबर्डी हे नयनरम्य पर्यटन स्थळ अनेक पर्यटकांना आकर्षित करणारे, निसर्ग सौंदर्याने नटलेले पर्यटन स्थळ आहे.

**उद्देश–**

१) अनेक पर्यटन भौगोलिक प्रदेश पाहण्यासाठी येतात.
२) महादेवावरलोकांची श्रद्धा असल्यामुळे देखील लोक दर्शनासाठी येतात.
३) महाशिवरात्रीला विशेष गर्दी असते कारण अनेकांचे ते श्रद्धास्थान आहे.

**समस्या–**

१) पर्वतीय भाग असल्यामुळे लहानमुले व वृद्धांसाठी चढण्यास समस्या निर्माण होते परंतु आता पायऱ्या केल्यामुळे पर्यटक सहजपणे चढू शकतात.
२) विरंगुळा म्हणून ते जेष्ठ नागरिक किंवा इतर ही पर्यटक दुरवरून येतात. परंतु राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे तेथुन परत मोर्शीला जावे लागते व तेथेच मुक्कामाची सोय होते.
३) मोठेमोठे खडाकचे भाग युवा वर्गाला आकर्षित करतात छायाचित्रे काढण्यासाठी जातात व पाय घसरून पडतात.
४) हत्तीडोह शांत दिसत असला तरी त्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे अनेक पर्यटकांचे प्राण गेल्याचेही निदर्शनास आले आहे. ज्या पर्यटकांना पोहण्याची हौस आहे. ते सहजच डोहात उतरतात व प्राण गमावून बसतात.

**सूचना –**

- पर्वतीय भाग असल्यामुळे बालकांना व वृद्धांना चढता यावे म्हणुन विशेष व्यवस्था करण्यात यावी.
- खडकांवर चढून छायाचित्रे काढण्यास सक्त मनाई करण्यात यावी.
- हत्तीडोहा जवळ धोक्याचे ठिकाण म्हणून फलक लावावेत.

**संदर्भः–**

1) Gedam, D. A. "Geographical Analaysis of Fairs at Salbardi". Indian Geographical Journal, Vol 49 (1), 1974
2) Salpekar, Aaradhana. Adventure and Geography of Tourism, Jannada Prakashan (P&D) New Delhi, 2009.
3) Tamaskar B.G. "Market Attractiveness of Arvi Upland" Geographical Review of India, Vol.- 43 (3), 1981.
4) Tourism Policy of Maharashtra – 2006.
5) www.maharashtratourism.gov.in